# थिरूवअनंतपूरम जाहीरनामा

## आपल्या सामूहिक डिजिटल (अंकात्मक) भवितव्यासाठी

## एका नवीन परिसंस्थेचा उपक्रम

थिरूवनंतपुरमच्या केरळ कला व हस्तकला केंद्रात, आपण जागतिक समुदायाचे घटक, आज २ डिसेंबर २०२३ रोजी, सध्याच्या तांत्रिक व सामाजिक व्यवस्थेत बंधुत्व आणि सहकार्याची भावना रुजवण्याच्या प्रेरणेने, सामाजिक लवचिकतेच्या मूलगामी तत्वांचा शोध घेणाऱ्या परिषदेसाठी जमलो आहोत.

डिजिटल भांडवलशाहीच्या बाह्यतावादी आवेगाचा प्रभाव दूर करण्यासाठी; सहकारी क्षेत्राने सृजित केलेली उत्पादन तंत्रे आणि व्यावहारिकदृष्ट्या स्थापित सिद्धांत, यांनी नव्या मंचांद्वारे ही जागा अधिक्रमित करायला हवी. त्यासाठी नेहमीचा (प्रस्थापित) मार्ग बदलून, मुलभूत परिवर्तनासह नवे मार्ग निवडण्याची आवश्यकता आहे. आपली सामूहिक डिजिटल तांत्रिक संसाधने, त्यांचे भवितव्य, यांची सामाईक मालकी उपलब्ध झाली, तर अशा तांत्रिक सहयोगाद्वारे, नव्या उपक्रमशील परिसंस्था नवसंशोधनांसाठी आकाराला येतील. या परिसंस्था सर्जनशील समाजव्यवस्थेचे, समावेशी संगोपन आणि पालनपोषण करण्यास उपयुक्त ठरतील. याच उद्देशांच्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी, खालील ५ कलमी कार्यसूची (अजेंडा) शी आम्ही सहमत व कटिबध्द आहोत.

### १- सार्वजनिक वस्तू व सेवा वितरणाच्या नाविन्यासाठी आदर्श व्यवस्था

- सामान्य वस्तू व सेवा, ज्यांना सार्वजनिक वित्तपुरवठा उपलब्ध आहे आणि ज्यांच्या सुयोग्य वितरण प्रक्रियेत, लोकशाही मूल्याधारित प्रशासकीय व्यवस्थेचा अंतर्भाव आहे, अशा सामान्य डिजिटल सेवा व त्यांच्या मूल्याधारित वितरणात, चैतन्यदायी लोकसहभाग व उद्यमशील उद्योजक संस्कृतीला, उपयुक्त उत्तेजन मिळायला हवे.
- सार्वजनिक वापराच्या तरतुदींसाठी, आंतरजाल जोडणी, आंतरजालावर उपलब्ध ॲप्लिकेशन 'ॲप' (उपयोजन) तसेच पायाभूत सुविधांमधील 'क्लाउड सेवा', (क्लाउड सर्व्हिसेस) सामायिक विदा स्थळे (डेटा स्पेसेस), डिजिटल (अंकात्मक) बुद्धिमत्ता,(डिजिटल इंटिलिजन्स) परवाना मानके (लायसेन्सिंग स्टॅन्डर्डस), व अन्य अंकात्मक पायाभूत सुविधा (डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर) यांना आवश्यक धोरणात्मक उत्तेजन असले पाहिजे.
- आपले ज्ञान आणि कौशल्याधारे ज्यांनी विदा निर्मिती (डेटा जनरेशन) केले, अशा समुदायांना शासकीय व्यवस्थेत आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार असायला हवा. त्यांची विदा निर्मिती सदैव सुखरूप व सुरक्षित राहिल, अशी चोख व्यवस्थाही असायला हवी.

## २- कामकाज भवितव्याच्या सशक्तिकरणासाठी संपूर्ण समाजाचा दृष्टिकोन

- गिग अर्थकारण (गिग इकॉनॉमी), ही अर्धवेळ अथवा तात्पुरत्या कामगारांचे अमानुषीकरण करते तसेच त्यांच्याशी संबंधित समाजाला परके ठरवते. त्यापेक्षा समाजाने न्याय, समता आणि कामकाजाचा सन्मान प्राप्त होईल, अशा योजनांना उत्तेजन द्यायला हवे. या संदर्भात स्त्रीवादी सामाजिक करारांना प्रशस्त करणारा मार्ग सुयोग्य आहे. त्याचे अनुसरण करायला हवे.
- अल्गोरिदम म्हणजे संगणकावरील असे एखादे काम, ज्यासाठी पायरी गणिक वाटचालीची कार्यसूची तयार असते. तांत्रिक ज्ञानावर आधारित अशा कामांसाठी, कर्मचाऱ्यांचे शोषण पूर्णतः असमर्थनीय आहे. अल्गोरिदम बुद्धिमत्ता ही सामाजिक सुरक्षेचे नियम आणि सामाजिक निरीक्षण, यांच्या कायम अधिन असायला हवी.
- पुढल्या पिढीच्या अर्थकारणात दडलेली संभाव्य क्षमता उलगडतांना, कामगारांची मालकी असलेल्या संस्थांच्या संगोपनाची हमी, त्याचबरोबर मौल्यवान विदा (डेटा) आणि आंतरजालावरील नेटवर्क संपत्तीचे पुनर्वितरण, यांची खात्री असली पाहिजे.

## ३- डिजिटल व्यवस्थेत सहकारी व सामाजिक योजनांची सर्वंकष दुरुस्ती

- अर्थकारणाच्या नव्या आर्थिक मंचावर, नव्या संस्थात्मक यंत्रणा व संबंधित कायद्यात दुरुस्त्या व सुधारणा आवश्यक आहेत. सहकारी संस्थांची स्पर्धात्मकता आणि शाश्वत विकासाची क्षमता त्यावरच अवलंबून असते. महिला आणि तरुणांचे नेतृत्व आणि संचालन असलेल्या संस्थांवर, त्यासाठी विशेष धोरणात्मक प्रकाशझोत हवा.
- डिजिटल (अंकात्मक) अर्थव्यवस्थेत, उत्पादक सहकारी संस्थांचा प्रभावी सहभाग असावा, त्यासाठी कर प्रोत्साहन योजना, प्राधान्यक्रमाने खरेदी, सार्वजनिक वित्तपुरवठा ही धोरणात्मक साधने अतिशय महत्वाची आहेत.

## ४- नागरी बुद्धिमत्ता आणि सामाजिक व राजकीय नागरिकत्व

- डिजिटल (अंकात्मक) व्यवस्थेच्या नागरी वापरकर्त्यांसाठी, या व्यवस्थेच्या संक्रमण काळातल्या प्रवासात, धोरणात्मक राजकीय दूरदृष्टी (व्हिजन) चा प्रभावी अवलंब हवा, ज्यात मुख्यत्वे आदर्शवादी लोकशाही मूल्यांचे अनुसरण, कठोर विश्लेषणात्मक कारणमीमांसा आणि डिजिटल हक्कांविषयी जागरूकता, यांचा समावेश असावा.
- शासकीय शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या धोरणात, सहकाराचे मौलिक सिद्धांत, आदर्श सामाजिक संस्थांचे दाखले आणि मार्गदर्शक उपक्रम, यांना प्राधान्य द्यायला हवे.

### ५- शाश्वत (चिरस्थायी) डिजिटल प्रवासाचे संक्रमण

- पर्यावरणावर कोणताही प्रतिकूल अथवा विपरीत परिणाम होणार नाही, अशा प्रकारे तंत्रज्ञानाचा वापर अतिशय संतुलित, सावध आणि जबाबदारीने करणे आवश्यक आहे. शाश्वत (चिरस्थायी) समाज व्यवस्थेचे सहअस्तित्व त्यावरच अवलंबून असते. त्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान (डिजिटलायझेशन) व त्याला अनुरूप धोरणे, परस्परांशी सुसंगत हवीत.
- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अर्थव्यवस्थेने, पुनरुज्जीवनाची शक्यता असलेले स्थानिक ज्ञान, शाश्वत उपजीविकेच्या प्रगतीचे प्रयोग व मानवी आणि मानवेतर जगाचे सुसंवादी सहअस्तित्व, यांना अनुकूल ठरेल  अशा वातावरणास, विशेष प्राधान्य दिले पाहिजे.

तर्फे वितरीत

K-DISC Kerala Development and Innovation Strategic Council

IT for Change

Platform Cooperativism Consortium

समर्थनासाठी लिहा * पत्ता- itforchangepcc2023@gmail.com